13 JUN 2022
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अर्थव्यवस्थेला चालना देणारे संशोधन गरजेचे

## डॉ. महाजन यांचे प्रतिपादन : कर्मवीर हिरे महाविद्यालयात कार्यशाळा

प्रतिनिधी
गारगोटी

'समाजाच्या विविध समस्यांवर उपाय शोधणारे व देशाच्या अर्थव्यवस्थेला चालना देणारे संशोधन सध्या गरजेचे आहे. यासाठी बहुशाखीय व आंतरशाखीय संशोधन होणे, त्याची व्याप्ती वाढवणे व संशोधनाची व्यावहारिक चिकित्सा होणे आवश्यक', असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य विभागाचे विभागप्रमुख प्रा. डॉ. एस. एस. महाजन यांनी व्यक्त केले. ते येथील कर्मवीर हिरे महाविद्यालयाच्या वाणिज्य विभाग व अंतर्गत दर्जा हमी कक्षाच्या वतीने आयोजित "संशोधन पद्धती व परिमाणात्मक तंत्र" या विषयावरील राष्ट्रीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. पी. बी. पाटील उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रा. डॉ. एस. एस. महाजन म्हणाले, "आजच्या घडीला संशोधन हे केवळ एखादी पदवी मिळवण्यापुरते मर्यादित राहिलेले नाही. त्या संशोधनातून अर्थव्यवस्था, समाज, उद्योग यांना काहीतरी नवीन तंत्र अथवा पद्धती मिळणे अपेक्षित आहे. यासाठी नवीन संशोधकांनी वाचन, चिंतन, संशोधनातील सृजनशीलता व समाजोपयोगी जाणीव याबाबत सजग राहून काम करणे अपेक्षित आहे."




गारगोटी : राष्ट्रीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना डॉ. एस. एस. महाजन, प्राचार्य डॉ. पी. बी. पाटील व मान्यवर.

यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. पी. बी. पाटील म्हणाले, "संशोधनासाठी विषय निवडण्यापूर्वी त्या विषयाची प्राथमिक माहिती व त्याची व्याप्ती समजावून घेणे आवश्यक आहे. संशोधनादरम्यान वेगवेगळी तंत्रे, गृहीतके वापरणे व त्यातून निष्कर्षप्रत पोहोचण्यासाठी विविध साधनांचा वापर करणे गरजेचे आहे."

कार्यशाळेत सायबर कोल्हापूरचे संख्याशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. बाबू झकारिया यांनी 'संशोधनातील नमुना तंत्र' व 'संशोधन पद्धती व संख्याशास्त्र तंत्र' याविषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

प्रास्ताविक वाणिज्य विभागप्रमुख डॉ. सागर पोवार यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. माधवी पवार यांनी केले. समन्वयक डॉ. सागर व्हनाळकर यांनी आभार मानले.

लोकमत

# तिसऱ्या दिवशी ६३० जणांची प्रवेश परीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विविध अधिविभाग आणि संलग्नित महाविद्यालयांमधील पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रवेशासाठीची परीक्षा सध्या सुरू आहे. त्याच्या तिसऱ्या दिवशी रविवारी ६३० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, बेळगाव या जिल्ह्यातील एकूण १६ केंद्रावर एम. एस्सी. एन्व्हारमेंटल सायन्स, बायो केमिस्ट्री, बायोटेक्नॉलॉजी, मेडिकल एन्ट्रन्स, रशियन लँग्वेज या अभ्यासक्रमाची परीक्षा रविवारी ऑफलाइन झाली. आज, सोमवारी या प्रवेश परीक्षेचा अखेरचा दिवस असल्याची माहिती डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.